

# कोंढाळी नगरपंचायत


ता. काटोल, जिल्हा नागपूर-४४११०३

स्थापना दिनांक ०९/१०/२०२३

Email-npkondhali@gmail.com




जा.क्र./कोनप/बांधकाम.वि./२३२/२०२५ दिनांक : ११/०६/२०२५

## जाहीर सूचना

नगरपंचायत कोंढाळी, जिल्हा नागपूर येथे प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) अंतर्गत शहरस्तरीय तांत्रिक तज्ञ (CLTC) स्थापत्य अभियंताची एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरूपात केवळ ११ महिन्यांकरिता थेट मुलाखतीद्वारे नियुक्ती करावयाची आहे. खालील नमूद केलेली कंत्राटी पदे भरण्यासाठी दि. १२/०६/२०२५ ते दि. २२/०६/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत न.प. कोंढाळी कार्यालय येथे अर्ज स्वीकारण्यात येणार आहे. तरी सर्व इच्छुक पात्रताधारक उमेदवारांनी नगरपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत आवश्यक कागदपत्रांसह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून अर्ज सादर करावे. छाननीअंती पात्र अर्जदाराच्या मुलाखतीचा दिनांक, ठिकाण व वेळ कळविण्यात येईल.

| अ. क्र | पदाचे नाव कंत्राटी पद्धतीने | पद संख्या | मासिक मानधन (रुपयांत) |
|---|---|---|---|
| १. | स्थापत्य अभियंता | ०१ | रु. ३५,०००/- (मा. मुख्य अभियंता-२, तथा राज्यस्तरीय समन्वय अधिकारी, रा. सु.अ. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी), म्हाडा, यांचे पत्र क्र.एमएच/मुअर/उमुअ/काअ१/प्रआयो/प्रा/न.क्र./३५०/१८ दि.०६/०६/२०१८ नुसार |

**शैक्षणिक अर्हता व अनुभव : -**

1. At least 03 year's experience in procurement, design and supervision of infrastructure work.
2. Post Graduate or Graduate Degree in Civil Engineering (Degree or Diploma).
3. Ability to assist ULBS to set standards and procedures for ensuring and monitoring compliances.
4. Prior experiences as municipal engineer or any other housing scheme will be an added advantage.
5. Fluency in local language essential.

**अटी व शर्ती :**

1. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र सादर करावे.
2. जाहिरातीमध्ये नमूद असलेले पद अस्थायी व तात्पुरते स्वरूपात कंत्राटी नेमणूक असून या पदावरील कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी गणले जाणार नाही.
3. सदर पदाची नियुक्ती कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांच्याकडे राखून ठेवले आहे.
4. कंत्राटी पद्धतीने निवड उमेदवारांनी विहित नमुन्यात रु. १००/- स्टॅम्प पेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक राहील.
5. उपरोक्त पदाकरिता देय असलेले मानधन प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत प्राप्त निधीवर निर्भर राहील.
6. नियुक्तीबाबत कागदपत्रे सादर करणे संबंधाने अडचण असल्यास बांधकाम विभाग, नगरपंचायत कार्यालय, कोंढाळी यांच्याशी संपर्क साधावा.

**स्वा/-**

**(धनंजय बोरीकर)**

**प्रशासक तथा मुख्याधिकारी,**

**नगरपंचायत, कोंढाळी**